**प्रताप महाविद्यालय (स्वायत्त)**
**मराठी विभाग**
**शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४**
**वार्षिक अहवाल**

**मराठी विभागाची शैक्षणिक सहल:**

एस. वाय. टी. वाय. बी. ए. आणि एम. ए. प्रथम व द्वितीय वर्गाच्या विद्यार्थ्यांना घेऊन दि. ०६/११/२०२३ ते ०९/११/२०२३ या कालावधीत महाड, पाली, महाड, रायगड, मुरुड जंजिरा, काशीद बीच, वर्सोली बीच, अक्षी, नगाव या वेग-वेगळ्या ठिकाणी जाऊन आली. उपरोक्त वर्गांच्या अभ्यासक्रमातील काही घटकांच्या प्रत्यक्ष अभ्यासाबरोबरच या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधन रूची निर्माण व्हावी, तद्वतच मराठी वाङमय व समाजशास्त्र, मराठी वाङमय व इतिहास, मराठी वाङमय व भूगोल इत्यादी अंतर्विद्याशाखीय अभ्यासाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा हा उद्देश या शैक्षणिक सहलीचा होता.




अलिबाग येथील जे.एस. एम. कॉलेजाच्या प्रा. हर्षला महाजन या मराठी भाषेतील आद्य अक्षीच्या शिलालेखाची विद्यर्थ्यांना माहिती देताना.



रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीवर पुष्प अर्पण करताना विभागप्रमुख डॉ. रमेश माने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे आणि विद्यार्थी.




महाड येथील क्रांतिभूमी चवदार तळ्याच्या स्मारकावर डॉ. रमेश माने, डॉ. विलास गावित, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. प्रतिभा पाटील

**मराठी भाषा दिन:**

दि. २७ फेब्रुवारी २०२३ रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमित्ताने साजरा करण्यात येणाऱ्या मराठी भाषा दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी माननीय प्राचार्य डॉ. ए. बी. जैन यांच्या उपस्थितीत कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर मराठी विभागात कवी कुसुमाग्रज यांच्या कवितांचे अभिवाचन विद्यार्थी व विभागातील प्राध्यापकांनी प्रातिनिधिक स्वरूपात केले.

**चर्चासत्र:**

दि. ११ एप्रिलच्या २०२४ रोजी डॉ. म. सु. पगारे लिखित ‘बा! तथागता’ या विशाल काव्यावर आधारित “बा, तथागता: मानवतावादी सौंदर्यशास्त्र” या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कबचौउमविचे प्रथम कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली भाषाविभागाचे संचालक डॉ.म. सु. पगारे यांनी बीजभाषण केले तर, डॉ संजीव गिरासे, जयसिंग वाघ, धनराज धनगर या अभ्यासाकांनी या पुस्तकावर चर्चा केली. यावेळी डॉ. रमेश माने संपादित ‘बा, तथागता: मानवतावादी सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशनही करण्यात आले.



भाषा विभागाचे संचालक डॉ. म. सु. पगारे बीजभाषण करताना.



कबचौउमविचे प्रथम कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना.

**उजळणी वर्गात सहभाग:**

दि. ११ ते २३ सप्टेंबर २०२३ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर द्वारा आयोजित केलेल्या मराठी विषयाच्या उजळणी वर्गात प्रा. ज्ञानेश्वर कांबळे व डॉ. रमेश माने यांनी सहभाग नोंदवला.

**९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन:**

दि. ०२ ते ०४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान अमळनेर येथे झालेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागत गीत मराठी विभागातील डॉ. रमेश माने यांनी लिहिले, तसेच संमेलनाच्या स्मरणिकेचे संपादनही त्यांनी केले आहे. प्रा. ज्ञानेश्वर कांबळे या संपादन मंडळात सदस्य होते. त्याबरोबरच डॉ. रमेश माने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. योगेश पाटील डॉ. विलास गावीत आणि विभागातील विद्यार्थ्यांनी या संमेलनाच्या विविध समित्यांत महत्त्वाची भूमिका पार पडली आहे. या संमेलनात आलेल्या अनेक प्रसिद्ध साहित्यिकांनी मराठी विभागाला भेट दिली.




गीतकार प्रवीण दवणे यांना स्मरणिका भेट देताना संमेलन कार्याध्यक्ष डॉ. जोशी डॉ. रमेश माने आणि प्रा. ज्ञानेश्वर कांबळे.




९७ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे, त्यांच्या सहचारिणी संमेलन कार्याध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, डॉ. रमेश माने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे आणि इत्तर

**९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मुलाखती:**

दि. ०२ ते ०४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान अमळनेर येथे झालेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आलेल्या निवडक प्रसिद्ध लेखकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखत समितीचे सह समन्वयक म्हणून मराठी विभागाचे प्रा. योगेश पाटील व विभागातील इतर प्राध्यापक डॉ. रमेश माने, प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. योगेश पाटील डॉ. विलास गावीत आणि विभागातील विद्यार्थ्यांनी या मुलाखतीच्या उपक्रमात महत्त्वाची भूमिका पार पडली आहे.

डॉ. रमेश माने
प्रमुख- मराठी विभाग
प्रताप महाविद्यालय, (स्वायत्त) अमळनेर